कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/जा.रंभू.दिन/२०२४-२५/२८०२
दि. २५/०३/२०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीतर्फे गुरुवार दि. २७ मार्च २०२५ रोजी साय. ६.३० वा. कला अकादमीच्या दिनानाथ मंगेशकर सभागृहात जागतिक रंगभूमी दिवस साजरा करण्यात येणार आहे. या प्रसंगी गोव्याचे कला व संस्कृती मंत्री तथा कला अकादमीचे अध्यक्ष श्री. गोविंद गावडे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार असून गोवा सरकारचे कला व संस्कृती सचिव श्री. सुनील अंचिपाका (आय.ए.एस) यांची खास निमंत्रीत म्हणून उपस्थिती या प्रसंगी लाभणार आहे. या समारंभाला जोडून जॉर्जिया स्थित कलाकारांतर्फे "लाईफ ऑफ अ क्लोन" हा नाटयप्रयोग लिबर्टी थिएटरतर्फे सादर होणार आहे.

सदर दिवशी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० दरम्यान उपरोल्लेखित नाटयकलाकारांतर्फे एका नाटयकार्यशाळेचे आयोजनही करण्यात आले आहे.

नाटयप्रेमी रसिकांनी, नाटयविद्यार्थ्यांनी व कलाकारांनी नाटयप्रयोगास उपस्थित राहून जॉर्जियन नाटयकृतीचा आस्वाद घ्यावा तसेच कार्यशाळेसाठीही उपस्थिती लावावी व नाटयकलेच्या संदर्भात आपल्या जाणिवा वृध्दिंगत कराव्यात असे आवाहन कला अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)